# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

MERC/ADM/RTI/002/2024/092 Dt. 02.02.2024

प्रति,
श्री. प्रदिप ज्ञानदेव मोहरे,
सी - ११०३, कासा अरबानो,
डाऊनटाऊन, पलावा सिटी,
फेस -२, डोंबिवली (पूर्व),
खोणी, ठाणे - ४२१२०४.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि.०४.०१.२०२४ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज, आयोगाच्या कार्यालयास दि.०५.०१.२०२४ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील मधील माहिती खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | आयोगाच्या कार्यालयातील स्वीय सहाय्यक (निवड श्रेणी आणि उच्च श्रेणी) पदावर कार्यरत असलेले सर्व स्वीय सहाय्यक यांच्या नियक्तीच्या वेळी अर्जदारांनी कार्यालयास सादर केलेल्या अर्जाचा तपशील (बायोडाटा) व त्यानुषंगाने सोबत जोडलेल्या शैक्षणिक अर्हता, स्वीय सहाय्यक (निवड श्रेणी आणि उच्च श्रेणी) १२० wpm steno (इंग्रजी) व ८० wpm steno (मराठी) शासन मान्यता प्राप्त व ५० wpm इंग्रजी आणि ३० wpm मराठी टाईपिंग सर्टिफिकेट शासनमान्यता प्रमाणपत्र व इतर अनुभव प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती मिळणेबाबत. | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अधिनियम ८ मधील पोट कलम (त्र) मधील तरतूदीनूसार "जी माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर नाही अशी आणि लोकहीताच्या दृष्टीने व्यापक जनहीत साध्य न करणारी किंवा ज्या व्यक्तीच्या खाजगी बाबतीत आंगतुक हस्तक्षेप करेल अशी वैयक्तिक तपशील संबंधातील माहिती अर्जदाराला देण्यात येवू नये" असे नमूद केले आहे.<br><br>सदर कलमाच्या आधारे शासनाने देखिल शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१२ / ९८९ /प्र. क्र. ४७९ / सहा, दि.१७.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकामध्ये नमूद केले आहे की, जी माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर नाही अशी आणि लोकहीताच्या दृष्टीने व्यापक जनहीत साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थ पक्षाबरोबर, उद्भवलेल्या वैयक्तिक वादाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती, माहितीच्या अधिकारात अर्जदाराला देण्यात येऊ नये. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर कलमाच्या आधारे दि.०५.०१.२०२१ रोजीच्या जाहीर केलेल्या आदेशामध्ये अशी वैयक्तिक माहिती अर्जदारास देण्यात येवू नये असे नमूद केले आहे. |
| २ | आयोगाच्या कार्यालयात ज्या ज्या वेळी स्वीय सहाय्यक (निवड श्रेणी आणि उच्च श्रेणी) पदे भरली आहेत त्या पदांची प्रत्येक जाहिराताची साक्षांकित प्रत देण्यात यावी. | |
| ३ | स्वीय सहाय्यक (निवड श्रेणी) पदावर अतिरिक्त असलेल्या कर्मचाऱ्याचा | |

| | | |
|---|---|---|
| | तपशीलाच्या छायांकित प्रती मिळणेबाबत. | उपरोक्त बाबींचा विचार करता, आपल्या मागणीनुसार आपण मागितलेली माहिती व त्यांच्या कागदपत्रांच्या प्रती आपणांस उपलब्ध करून देता येत नाही यांची नोंद घ्यावी. |
| ४ | तसेच सदर कर्मचारी जर अतिरिक्त पदावर कार्यरत असेल तर त्याला दरवर्षी देण्यात येणारी वार्षिक वेतनवाढ, भत्ते आणि आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिलेला आहे का, असल्यास (MCSR) च्या कोणत्या नियमानुसार त्यांना वार्षिक वेतनवाढ, भत्ते आणि आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे, त्यांच्या छायांकित प्रती मिळणेबाबत. | |
| ५ | श्रीमती संगिता कोटीयन, स्वीय सहाय्यक (निवड श्रेणी) पदावर कार्यरत असताना पदाचा राजीनामा देण्यात आलेला होता त्याची साक्षांकित प्रत मिळणेबाबत.<br>(अ). श्रीमती संगीता कोटीयन यांना तद्नंतर पुन्हा दिलेले नियुक्ती आदेशाची साक्षांकित प्रत मिळणेबाबत.<br>(ब). श्रीमती संगीता कोटीयन यांना वेळोवेळी प्रशासनाचे सर्व कामे दिल्याच्या आदेशाच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत.<br>(क). ज्या आदेशाने प्रशासनातील श्रीमती कोटीयन यांची कामे काढून घेतली होती, त्या आदेशाच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत. | |

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री. अभिजीत चाटुफळे, उपसंचालक (प्रशासन व वित्त) / प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४ / ६५ / ६९ **Email: abhijeet.chatuphale@merc.gov.in**.

आपला विश्वासू,

(अरूण वाळुंज)
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव